
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा.
दा. क्र. २६११८

# झाड चांदण्याचे...

प्रवीण दवणे



BVBK-0402698

# खाऊ चांदण्यांचा...

## प्रवीण दवणे

BVBK-0402698

मनोविकास प्रकाशन, मुंबई.

**प्रकाशक**
श्री. अरविंद घनश्याम पाटकर
मनोविकास प्रकाशन
आमदार निवास
मंत्रालयाजवळ
मुंबई ४०००३२

© **प्रवीण दवणे**
बी ३०३, राजहंस
उमेदनगर,
लुईसवाडी,
ठाणे ४००६०४

**मुद्रक**
मुगद ऑफसेट प्रिंटर्स
गाळा नं. २, पंढारे कांपाउंड,
बाबुराव जगताप मार्ग,
भायखळा, मुंबई – ११

**मुखपृष्ठ / रेखांकने**
सतीश भावसार

**अक्षरजुळणी**
ओंकार टाईपसेटर्स
डॉ. पंडित हॉस्पिटल
ठाणे.

**प्रथमावृत्ती**
जून १९९१

**मूल्य 15 रुपये.**

## सप्रेम...

बालपण हेच एक गाणं असतं. अनेक कल्पनांनी, स्वप्नांनी झगमगणारं व्यवहाराची, कर्तव्यांची उन्हं अजून यायची असतात. उमलू पहाणाऱ्या कळयांवरील दवबिंदूंच्या वाटेनेच मन विहरत असतं. याच वयात चांगल्या वाचनाची, मधुर स्वरांची, खरं तर जे जे उत्तम आहे त्या सर्वांची गोडी लागू शकते. फार जागेपणानं जगायचा हा काळ असतो. म्हणून अशा वयातील मुलांच्या भोवती असणाऱ्या मोठया माणसांनी, त्यांची जगण्याची दृष्टीच सुंदर होईल असा प्रयत्न करायचा असतो. अशा मनापासून केलेल्या प्रयत्नांतील एक प्रयत्न म्हणजे ' झाड चांदण्याचे' हा कविता संग्रह. विविध कारणांसाठी लिहिलेल्या, कधी कारणाशिवायच स्फुरलेल्या बालगीतांचा हा संग्रह आहे. अनेकदा शाळेतील स्नेह संमेलनाला, कार्यक्रमांना बालगीतांची गरज असते, अशा सर्वांना हा संग्रह उपयोगी होईल.


सर्वच कविता, गीतं लयबध्द, त्या वयाचाच ताल पकडणारी आहेत. पावसाच्या गाण्यांपासून सुट्टीच्या गाण्यांपर्यंत मुलांना आवडणारे सर्व विषय त्यात गुंफलेले आहेत. हा माझा पहिलाच काव्य संग्रह ! माझं श्रध्दास्थान कविवर्य कुसुमाग्रज ! तीर्थरूप कुसुमाग्रजांचा आशीर्वाद म्हणजे भविष्यातील वाटचालीच्या यशाची निश्चितीच. माझ्या नम्र विनंतीला त्यांनी वत्सलतेने होकार दिला. नाशिकहून तात्यासाहेबांचे शब्दरूप आशीर्वाद घेऊन येताना मीच एक चांदण्याचं झाड झालो होतो. मी एवढंच सांगतो,"तात्यासाहेब, मी आजन्म कृतज्ञ राहीन !"

असा कविता संग्रह प्रकाशित व्हावा, तो मुलांपर्यंत पोहोचावा अशी माझी कितीही इच्छा असली तरी तशी इच्छा प्रकाशकांना होणं महत्वाचं. 'मनोविकास' प्रकाशनाचे श्री. अरविंद पाटकर हे एक स्फूर्तिदायी व्यक्तिमत्व आहे. समाजाला सुंदर करणारं वाङ्‌मय प्रसिध्द करावं या ध्येयाने ते या व्यवसायात उतरले आहेत. त्यांचे श्रेय आभारापलिकडले आहे. पुस्तक निर्मितीच्या क्षणी चित्रकार सतीश भावसार, अक्षरजुळणी करणारे श्री. अभिजित पंडित व सौ. शंकुतला पंडित, श्री. अरविंद दोडे यांच्या समवेत रंगलेल्या मैफली हा एक आनंददायी अनुभव होता. वाङ्‌मयाची जाण असणारे तरल प्रतिभेचे चित्रकार श्री. सतीश भावसार यांनी हे 'चांदण्याचं झाड' मुलांना आवडेल अशा कल्पकतेने सजवले आहे. ते आता मित्रच झाले आहेत. पुस्तकाची देखणी अक्षरजुळणी करणारे श्री. अभिजित पंडित यांना 'अक्षरशः' धन्यवाद देतो.

माझ्या या पुस्तकातील गीतांना वेळोवेळी संगीतसाज देऊन बालश्रोत्यांपर्यंत आणणारे, संगीत दिग्दर्शक सौ. मीनाताई मंगेशकर, श्री. श्रीनिवास खळे, श्री. दीपक पाटेकर, श्री. नंदू होनप या सर्वांचे ऋण घेऊन जगताना नेहमीच आनंद होतो. त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतो.

ज्या बालवाचकांना हया पुस्तकातील कविता वाचताना आनंद होणार आहे, त्यांचे काही क्षण उमललेले जाणार आहेत. त्या सर्व निरागस मनांचे ऋण मी कधीच फेडू शकणार नाही. आपल्या सर्वांच्या मनात हे ' चांदण्याचे झाड ' रुजलं जाईल असा मला विश्वास वाटतो.

**प्रवीण दवणे**



या
विश्वातील
निरागसतेला...





# वेळूची बासरी

वेळूची बासरी शीळ वाजवी वारा
लपला आहे सांगा कोठे तो मुरलीधर न्यारा ।।धृ ।।

आभाळाचे रूप घेऊनी निळया ढगातून येतो
झरझर झरझर झऱ्यातुनी तो हिरवी माया देतो
गोड गुलाबी ओठामधुनी फुलातुनी हसणारा
लपला आहे सांगा कोठे तो मुरलीधर न्यारा ।।१।।

नवी डहाळी झोके घेता रानपाखरू हसते
रत्न जडविले पंखावरती मजेत झोके घेते
किलबिल हळवी होते जेथे तोच असे गाणारा
लपला आहे सांगा कोठे तो मुरलीधर न्यारा ।।२।।

चंद्रमण्यांचे झुंबर लवते रात्र सावळी होता
दवबिंदूना नवी झळाळी दिशा केशरी खुलता
दाही दिशांतुन, या रंगांतुन श्रीरंगच खुलणारा
लपला आहे सांगा कोठे तो मुरलीधर न्यारा ।।३।।



## फांदीवरची फुलपाखरे


फांदीवरची फुलपाखरे
आभाळात उडाली
स्वैर होऊया त्याच्यासंगे
धमाल सुट्टी आली ।।धृ ।।

नको अता हो धाक छडीचा
नको ती गणिते
इतिहासातील नको लढाई
नको अक्षवृत्ते
मैदानावर खेळायाची आता घाई झाली ।।१।।

गृहपाठ हो नवा अता हा
आईस्क्रीम खाण्याचा
मित्रासंगे हुंदडण्याचा
डिस्को गाण्याचा
एका ऐवजी दोन दोन, लिमलेट ठेवू गाली ।।२।।

मित्र मैत्रिणी मिळुनीं सारे
हिंडू चौपाटी
बाबांच्याही लागू पाठी
भेळपुरीसाठी
बेत किती हे रचले आम्ही मनाच्या महाली ।।३।।

२९८८ दिनांक ७।०।९२
७।·९।·




## शाळेला सुट्टी –मामाशी गट्टी

शाळेला सुट्टी
मामाशी गट्टी
पहिल्या गाडीनं जाऊया
डोंगर निळे न्
हिरवे तळे
संथ त्यामध्ये न्हाऊया ।।धृ ।।

मामाच्या गावाला
इवलिशी नदी
नदीत पोहू
साऱ्यांच्या आधी
आडव्या तिडव्या वडाच्या फांद्या
सूर पारंब्या खेळूया ।।१।।

मामाच्या गावाला
अंगण खुले
मजेत नाचू
सारी मुले
घरटयामधल्या चिमण्यापिलांशी
नुसत्या डोळयांनी बोलूया ।।२।।

झाली परीक्षा
आलीच सुट्टी
सारेच भाचे
झालेत हट्टी
आईबाबांच्या भवती आता
मामाचे गाणे गाऊया ।।३।।



# घरात आमुच्या घरटं एक

घरात आमुच्या घरटं एक
चिमणा चिमणीचं
जडलं त्यांच्याशी माझं
नातं प्रेमाचं ।।धृ ।।

किलबिलाट येतो कानी
जमवितात दाणापाणी
मलाच ऐकु येती हो
गोड गोड त्यांची गाणी
माझ्या कानी
हळू सांगती
गुपीत आकाशाचं ।।१।।

एके दिवशी सूर नवा
घरटयामधुनी आला
चिमणीसंगे चिमणाही
मजेत फडफडला
कौतुक केलं
डोळयांनी
चिमणीच्या बाळाचं ।।२।।

घरात असता एकटाच मी
करमत जेव्हा नाही
सान गोजीरे पिल्लू आता
घरटयामधुनी पाही
आई बाबा
येता माझे
मी पिल्लू दोघांचं ।।३।।




## दादा रुसला – ताई रुसली...

दादा रुसला, ताई रुसली, रुसली आज आई
काय करावे, काही कळेना बाई ।।धृ ।।

म्हणती सारे आज मला
भली खोडकी जिरली
शाळा सुटता धावत येता
स्वारी घसरुन पडली
आई म्हणते, मला आजला कसली आहे घाई
काय करावे, काही कळेना बाई ।।१।।

घाई कसली समजत नाही
लगीन बाहुलीचे !
आईलाही कसे कळेना
मन हे आईचे
माझी छकुली, नवरी झाली, आज सासरी जाई
काय करावे, काही कळेना बाई ।।२।।

हसती सारे मोठयाने, पण
डोळा माझ्या पाणी
नवरदेव हा किती धिटुकला
घेऊन जाई राणी
कशी कळेना, घडली बाई सारीच ही नवलाई
काय करावे, काही कळेना बाई ।।३।।



# जरा ओलसर वाऱ्यावरती


जरा ओलसर वाऱ्यावरती
उडून जाऊ चला
चम्‌चम्‌णाऱ्या या थेंबांना
ओढून आणू चला ।।धृ ।।

गीत गोड हे घेउन ओठी
पहा..पहा.. थरथरली पाती
त्या तालावर, या माळावर
मिळून नाचू चला ।।१।।

रंग भोवती निळे जांभळे
सुगंध आता नवा दरवळे
या धरणीचे नवीन संगीत
ऐकून येऊ चला ।।२।।

जादूची ही हिरवी दुनिया
करेल कोणी नवीन किमया
टपटपताना पहिला पाऊस
झेलून घेऊ चला ।।३।।

भिजेल पुस्तक बुडेल शाळा
घडेल हे मग अनेक वेळा
चुकवून डोळा आईचा मग
भिजून गाऊ चला ।।४।।



## जगावेगळी शाळा


माझ्या हातात एक दिवस शाळा द्याल का ?
माझ्यासारखा गुरुजी कोठे शोधून पहाल का ? ।।धृ ।।

नाही खडू.. नाही पट्टी
नाहीच फळा
नाही पुस्तक, नाही वही
अभ्यास खुळा
पिक्चरमधले डिस्को गाणे संगे गाल का ?।।१।।

मधल्या सुट्टया चार
आणि पोरं मैदानात
शाळा भरण्याची घंटा
ठेवू कपाटात
अधून मधून लिमलेट गोळी गालात ठेवाल का ?।।२।।

गावस्कर अन् तेंडुलकर
यांना मी बोलवीन
त्यांच्या संगे मजेने
मी देखील खेळीन
चेंडू रवी शास्त्रीचा हळूच झेलाल का ?।।३।।

लाडू पेढे खाण्याची
देईन मी शिक्षा
रद्द करुन टाकीन
तुमच्या साऱ्या परीक्षा
शाळा सुटण्या आधीच तुम्ही घरी जाल का ?
माझ्या हातात एक दिवस शाळा द्याल का ?।।४।।




## अंगणात लावलय पैशाचं झाड

अंगणात लावलंय
पैशाचं झाड
झाडावर चढली
पोरटी द्वाड ।।ध्रृ ।।

पैसा काढला झाडावरून
खाऊचं कपाट टाकलं भरून
बिस्कीटं खाऊन
दुखतेय दाढ ।।१।।

पैशानं घेतली शाळा विकत
पैशाला एका शाळा फुकट
फुटली पाटी
पोरं उनाड ।।२।।

इतक्या पैशांचं करायचं काय ?
रात्रीला झोप मुळी लागलीच नाय
पैशाहून मोठे
आईचे लाड ।।३।।




## वर्षाराणी

वर्षाराणी माझ्या घरी येशील का ?
झिम्मा फुगडी माझ्यासंगे खेळशील का ? ।।धृ ।।

थेंबाचा करून जिना
येना तू झरझर
भातुकली इवली
खेळू चल भरभर
बाहुलीचे लाड माझ्या करशील का ? ।।१।।

करती का बाबा तुझे
गडगड गड..गडगड
रागावले ते जर
होते का धडधड
हळूच तू माझ्यामागे लपशील का ? ।।२।।

पैंजणाचा नाद तुझा
छम् छम् छम् छम्
चोहीकडे झाली
अत्तराची घम्घम्
किरणांच्या झुल्यावर झुलशील का ? ।।३।।



## पंख उघडा


पंख उघडा
घ्या भरारी
आनंदाच्या
गाऊ लकेरी ।।धृ ।।

खुलीच आता
सारीच दारे
आलो कोठे
जिथे चंद्र तारे
उन्हही नसते
इथल्या दुपारी ।।१।।

सांगितले जे
एका फुलाने
वाऱ्यास शिकवू
तेच गोड गाणे
शेते पाहू
डोलणारी ।।२।।

क्र. २६८८ दिनांक ६।१०।८८
विषय का।वा

तीच शाळा
दूर का भासते ?
तेच घर हे
छोटेच वाटते
जग हे कळले
नभाच्या किनारी ।।३।।



# कधी वाटते...

कधी वाटते रोजचेच हे
रूप नाहीसे व्हावे
हिरव्या हिरव्या वनराईतून
स्वैर मुक्त हिंडावे ।।धृ ।।

होऊन हुप हुप माकड
घ्यावा उंच झोका
मित्रांना मग छळण्याचा
येईल हाती मोका
रोज सकाळी–संध्याकाळी
हिरवे पेरू खावे ।।१।।

होऊनी मुंगी बारीक
दुकानात मी जाईन
बरणीमधले पेढे बर्फी
फस्त करुन मी येईन
सापडलो जर केव्हा हाती
घेईन अनेक चावे ।।२।।

कधी होऊनी मोर भर्जरी
फुलवीन रंग पिसारा
खुशाल नाचीन अंगणातुनी
झेलीन पाऊसधारा
आकाशातील शतरंगांचे,
पाहीन मी देखावे ।।३।।

## बालांचा दरबार ..

निळया डोंगराआड तिथे हो सात समुद्रापार
राज्य मुलांचे... आनंदाचे... बालांचा दरबार ।।धृ ।।


नाहीत लाठया काठया तेथे
नाहीच कुठले शस्त्र
गालावरचे खटयाळ हासू
हेच आमुचे अस्त्र
राग कुणाला येतच नाही.. खळखळुनी हसणार
राज्य मुलांचे.. आनंदाचे बालांचा दरबार ।।१।।

नुसत्या बिस्कीट गोळया येथे
नाहीच पैसा... नोटा
इथल्या व्यापाऱ्यांना नसतो
कधी होत हो तोटा
कपाळावरी आठी येथे नाही कधी दिसणार
राज्य मुलांचे.. आनंदाचे बालांचा दरबार ।।२।।

राजा आणि प्रजा मिळून हो
संगे झोके घेती
कुणी हरला जर खेळामध्ये
चॉकलेट हो देती
जो तो नाचत गात इथे हो रोज तुम्हा दिसणार
राज्य मुलांचे आनंदाचे बालांचा दरबार ।।३।।



एकदाच या राज्यामध्ये
या हो तुम्ही सारे
तिकीट म्हणुनी सोबत घ्यावे
एक फूल हसणारे
पारतंत्र्य हो ठाऊक नाही मजेत बागडणार
राज्य मुलांचे आनंदाचे बालांचा दरबार ।।४।।




## गाणे स्वातंत्र्याचे !

गाणे स्वातंत्र्याचे.. गाणे मांगल्याचे
हृदयामधल्या चैतन्यातुन गाणे भारतभूचे ।।धृ ।।

गाणे नसते म्हणावयाचे
केवळ शब्द सुरांनी
गाणे असते जगावयाचे
आपुल्या समर्पणानी
समर्पणानी लढलेल्या त्या गाणे नरवीरांचे
गाणे स्वातंत्र्याचे.. गाणे मांगल्याचे ।।१।।

अनेक भाषा विविध प्रांत हे
अखंड एका ठायी
तळहातावर प्राण घेउनी
भारतभूच्या पायी
सुखशांती अन् समृद्धीच्या मंगल परंपरेचे
गाणे स्वातंत्र्याचे.. गाणे मांगल्याचे ।।२।।

सातरंग हे इंद्रधनुतुन
झुलती आनंदाने
एकच गाणे फुलते ओठी
सजते सात सुराने
कोटी कोटी हृदयातून गाऊ
गाणे अखंडतेचे ।।३।।




# गाणे आम्ही ... गाणे तुम्ही ...

केशर भिजला ऋतू नाचतो आता क्षितिजावरती
रंग पहाटे किलबिलणारे गाणे ओठावरती ।।धृ ।।

नव्या नव्या स्वप्नांचे येथे
झरे वाहती निळे
मन पक्ष्याला झाले आता
गगन नवे मोकळे
रवी किरणांतून सोनकवडसे हळूच कसे टपटपती
केशर भिजला ऋतू नाचतो आता क्षितिजावरती ।।१।।

दाही दिशांना गाणे
गाणे दिशाच दाही
गाणे आम्ही..गाणे तुम्ही..
भरुनी गाणे राही
गाण्यामधले सूर रुपेरी झुलती वाऱ्यावरती
केशर भिजला ऋतू नाचतो आता क्षितिजावरती ।।२।।




## चॉकलेटचा ठेवा..

गंमत जंमत आमुची ऐका जयदेवा
नैवेद्याला ठेवीन चॉकलेटचा ठेवा ।।धृ ।।

करतो तुमच्यापुढे एक तक्रार
अभ्यासाचा आम्हा जाच हो फार
आईची -रोजची कटकट ही भारी
बस अभ्यासाला म्हणते दादाची स्वारी
गणिते सोडवाया ... मदतीला धावा
नैवेद्याला ठेवीन .. चॉकलेटचा ठेवा ।।१।।

गंभीर आकडे.. वटारती डोळे
इतिहासातील राजा प्राणांशी खेळे
तीच ती परीक्षा .. डोकं दुखणं
हरवले आमुचे, कोठे अंगण ?
आईबाबांना .. थोडेसे शिकवा
नैवेद्याला ठेवीन .. चॉकलेटचा ठेवा ।।२।।





## ढगांचं घरटं




ढगांचं घरटं
सोडून दूर
पावसाचं पाखरू
आलं ग दूर
अलगद त्याच्या पंखावरून
येईन भिजून ग येईन भिजून ।।धृ ।।

घेतंय गिरकी वाऱ्यावर
मध्येच थांबतंय झाडावर
हळूच फूल मी घेईन खुडून
अलगद त्याच्या पंखावरून ।।१।।

आलंय माझ्या मित्राचं घर
उतरीन त्याच्या कौलावर
करीन हात मी त्याला दुरून
अलगद त्याच्या पंखावरून ।।२।।

पावसाचं पाखरू हसतंय छान
सोन्याच्या उन्हात झुलतंय पान
पानाच्या आड त्या राहीन दडून
अलगद त्याच्या पंखावरून ।।३।।





## टिक् टिक् टिक् घडयाळ कुठले ?

टिक् टिक् टिक्
घडयाळ कुठले ?... कधी कळेना बाई
पहाट होता
कसे समजते... कशी उठते चिउताई ।।धृ ।।

भूक लागली बाळाला
कसे कळे मनीमाऊला
वेळ जेवणाची माझ्या
कशी कळे त्या काऊला
हंबरताना मुके वासरू
कशा परतल्या गायी ।।१।।

कसे समजते चंद्राला
झाली संध्याकाळ
रात्रीच्या पायात कसे हो
लखलखणारे चाळ ?
कशी समजते.. सकाळ झाली
फुलून येते जाई ।।२।।

कुठे लाविले, कुणी लाविले
घडयाळ हे जादूचे ?
किल्ली देते कोण कळेना
हात कुठे हो त्याचे ?
डोळे शिणले विचार करुनी
काहीच कळले नाही ।।३।।




## वाहू लागले उनाड होउन..

वाहू लागले उनाड होउन खुशाल पाऊसवारे
तळहातावर आज झेलुया थेंब नवे हसणारे ।।धृ ।।

बघ नभात गडगड झाली
तृणपाती हसत म्हणाली
वर कुणा मेघ राजाची
ही वरात आज निघाली
वरातीत या आपण होऊ वरातीच गाणारे
तळहातावर आज झेलुया थेंब नवे हसणारे ।।१।।

कुणी केली अद्‌भुत किमया
टवटवीत झाली दुनीया
पंख पसरूनी थवे निघाले
जादूगार शोधाया
फुलपानांच्या मध्येच दडला हुडकून काढू सारे
तळहातावर आज झेलुया थेंब नवे हसणारे ।।२।।

या रिमझिमणाऱ्या धारा
मोराचा फुले पिसारा
पागोळीचे तोरण सजले
आज आपुल्या दारा
शाळेभवती तळे जाहले तळयात नाचू सारे
तळहातावर आज झेलुया थेंब नवे हसणारे ।।३।।



# काळोखाची उघडून खिडकी

काळोखाची उघडून खिडकी
आला उन्हाचा ससा
इकडून तिकडे... तिकडून इकडे
बागडतो ग कसा ।।धृ ।।

मऊ मऊ हिरव्या गवतावर
पानाआड कळीचं घर
घरात शिरून
जादू करून
साऱ्यांना म्हणतोय हसा ।।१।।

झरझर झऱ्याच्या काठावर
चिमण्या पिलांच्या ओठावर
ज्याच्या त्याच्या
हातात देतोय
आनंदाचा वसा ।।२।।

सारंच जग आता मजेत
झुळझुळ सुगंध आला हवेत
इवल्या हातात
गोड गोड गाण्यात
धरून ठेवा असा ।।३।।



## फुलबाजांची झाडे

फुलबाजांची झाडे अंगणात लावू
टपटपणाऱ्या फुलाफुलांना रंग नवे देऊ ।।धृ ।।

स्वर्गातील ती नक्षत्रे
आली आज भेटाया
आभाळीचा चंद्र लागला
घरापुढे ग डोलाया
गरगर गरगर भुइचक्राला ताल नवा देऊ
फुलबाजांची झाडे अंगणात लावू ।।१।।


माळ लवंगी भारीच उद्धट
अंगणात तडतडते
तिची करामत पाहून तेव्हा
पणती ही घाबरते
आनंदाच्या तेजासंगे गीत गोड गाऊ
फुलबाजांची झाडे अंगणात लावू ।।२।।

गोड फराळाची गर्दी
नवे पाहुणे घरी
भाऊबीज येता जवळी
आनंदाच्या सरी
दादाताईच्या प्रेमाची ज्योत नवी लाऊ
फुलबाजांची झाडे अंगणात लावू ।।३।।

BVBK-0402698

२६११ दिनांक ६।१०।९२
विषय ६११.९१





Back [illegible] pag

स्वागतार्ह :

श्री. प्रवीण दवणे हे नाव मराठी वाचकांना आता सुपरिचित झालेलं आहे. कवी म्हणून, गीतकार म्हणून आणि ललित लेखक म्हणूनही. आपल्या काव्यातून, ललितलेखन आणि [illegible] लेखनातून त्यांनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी वाचक अपेक्षा निर्माण केल्या आहेत. त्यांचा हा पहिला काव्यसंग्रह : चांदण्याचं झाड. ही काव्ये मुलांसाठी आहेत. बाहुलाबाहुलीच्या कक्षेतून बाहेर पडलेल्या कुमार वयाच्या मुलांसाठी. श्री. दवणे यांच्या लेखनाची सर्व वैशिष्ट्ये या गीतांतून प्रगट होतात. मुलांचे जग वेगळे आणि त्यांच्या प्रतिक्रियाही वेगळ्या, खास त्यांच्या असतात. या प्रतिक्रिया निरागस, पण देखण्या शब्दात, आणि मुलांच्या आकलनशक्तीला झेपतील अशा प्रतिमांच्या द्वारा व्यक्त करणे ही अशा गीतांची मागणी असते. या संग्रहातील बहुसंख्य काव्ये ती पूर्ण करतात. हे चांदण्याचं झाड कुमारवाचकांना कल्पनेची गोडी लावील, त्यांच्या भावविश्वाला चांगले वळण लावील असा मला विश्वास वाटतो. कवीला आणि काव्याला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

[illegible]